## प्रकरण पाच

# उपसंहार

# प्रकरण पाच

# उपसंहार

१९६० नंतर उदयाला आलेल्या कथा लेखकामध्ये चारुता सागर हे महत्वाचे कथालेखक आहेत. त्यांच्या कथासंग्रहामधील स्त्री जीवन कसे आहे हे अभ्यासण्यास आपण प्रवृत्त झालो.

ग्रामीण कथा म्हटले की, त्यामध्ये ग्रामीण स्त्री जीवनाचे प्रतिबिंब आलेच पाहिजे. ग्रामीण स्त्रीचे जीवन, ग्रामीण भागात स्त्रियांना मिळणारे स्थान, स्त्रियांकडे पाहण्याचा पुरूषांचा दृष्टिकोन, तिला दिली जाणारी वागणूक, हुंडा, दागिने, पैसा व तिचे सौंदर्य इ. कारणानी तिचा होणारा छळ, तिच्या वाट्याला येणारी संकटे, दु:खाचे प्रसंग, पती पसंत नसण्यातून निर्माण होणाऱ्या समस्या, नवऱ्याचा व्यसनीपणा, लहरी स्वभाव, सासूचा जाच, सासऱ्याचा अतिरेकीपणा इ. कारणांनी तिचे जीवन उध्वस्त झालेले दिसून येते.

चारुता सागरांच्या कथेमध्ये चिरेबंदी वाड्यातील स्त्रियांपासून ते भटकंती करणाऱ्या, भाकरी मागून खाणाऱ्या व पालात राहणाऱ्या स्त्रियांचेही जीवनचित्रण वास्तवतेने केलेले दिसून येते. याचा शोध घेण्याचा प्रयत्न लघुप्रबंधात केलेला आहे.

पहिल्या प्रकरणात चारुता सागर यांच्या कथांचे स्वरूप आणि वैशिष्ट्याचा विचार केला आहे. चारुता सागर यांचा कथालेखनाचा पिंड स्वतंत्र मनोवृत्तीचा आहे. यातूनच त्यांनी सैनिकी जीवनावर कथा लिहिलेल्या दिसून येतात. सैनिकी जीवनातील बारकावे. तेथील वातावरण, सैनिकांच्या अतृप्त कामवासना, उदास एकाकी जीवन यामुळे लागणारे दारूचे व्यसन, सैनिकी शिस्त व देशासाठी प्राणत्याग करण्याच्या वृत्तीचे दर्शन त्यांच्या कथातून दिसून येते.

चारुता सागरांनी अखंड भ्रमंती केली आहे. या भटकंतीत त्यांना अनेक भटक्या लोकांची जीवनशैली जवळून पाहता आली. नंदीवाले, रोहिले, फासेपारधी, सापगारूडी, डोंबारी इ. लोकांच्या जीवनातील बारकावे, त्यांच्या जातिव्यवस्थेचे नियम, स्त्रियांचे जीवन, भटकंतीमुळे त्यांच्या वाट्याला येणारे दु:ख, प्रस्थापित समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन इ. गोष्टींचा शोध त्यांच्या कथेत घेतलेला दिसून येतो.

ग्रामीण भागात शिक्षकाला असणारे महत्त्व, त्यांना समाजात मिळणारा मान, मुलांना शिकवण्यासाठी शिक्षकाने केलेली धडपड आणि सरकारी भ्रष्ट कारभारामुळे ग्रामीण भागातील शिक्षकाचा होणारा भावनिक कोंडमारा त्यांच्या कथेत दिसून येतो.

चारुता सागरांच्या कथामधून भुकेची वेदना तीव्रतेने जाणवते. भूक भागविण्यासाठी जातीने घालून दिलेले नियम मोडावे लागतात. चोरी करावी लागते, प्रसंगी पोटासाठी प्रेताची विल्हेवाट लावून त्यापासून मिळणाऱ्या मोबदल्यातून पोटाची आग विझवावी लागते याचे हृदयद्रावक चित्रण त्यांची कथा करते.

मानवी जीवनात अनेक नैसर्गिक समस्यांना तोंड द्यावे लागते. दुष्काळामुळे जनावरांचे होणारे हाल, रोगामुळे जनावरांचा होणारा मृत्यू, पुरामुळे ओढावणारी संकटे या समस्यातून चारुता सागरांची कथा प्रकटते.

ग्रामीण भागात सापाबद्दल असणाऱ्या अंधश्रद्धेतून विविध घटना घडतात. यातून चारुता सागरांची कथा प्रकटते. प्राणी आणि मानव यांच्यातील भावनेचे असणारे साधर्म्य चारुता सागरांनी मांडले आहे.

शेती हा ग्रामीण जीवनाचा कणाच. शेती करताना येणाऱ्या अडचणी, रोग, दुष्काळ यामुळे कुणब्याचे होणारे हाल व शेतात राबणाऱ्या कामगारांची होणारी पिळवणूक हेही त्यांच्या कथांचे विषय आहेत.

ग्रामीण स्त्रीजीवनाचे चित्रण करणे हा तर चारुता सागरांच्य कथालेखनाचा मुख्य विषयच. ग्रामीण भागातील जोगतीणीचे जीवन, तिच्यावर होणारा अत्याचार, तसेच दागिने, पैसा, सौदर्य यातून स्त्रियांच्यावर होणारा अन्याय, त्यांना सासू-सासरा, नणंद, दीर, पती यांच्याशी करावा लागणारा संघर्ष व यातून निर्माण होणारा ताणतणाव यातूनच चारुता सागरांची कथा साकारताना दिसते.

चारुता सागरांच्या कथेचे विविधांगी स्वरूप पाहिल्यानंतर त्यांच्या कथेच्या वैशिष्ट्यांचा विचार केला आहे. त्यांची कथा ही त्यांच्या अनुभवाशी एकनिष्ठ आहे आणि म्हणून ती ग्रामीण मातीशी नाते सांगणारी आहे. ग्रामीण समाजाचे चित्रण करणे हे चारुता सागरांच्या कथेचे वैशिष्ट्य आहे.

चारुता सागरांच्या बऱ्याच कथांचे शेवट हे अनपेक्षित होतात. त्यांनी अनेक कथांचे शेवट करीत असताना अचानक कलाटणी दिलेली दिसून येते. यातून वाचक कधी कधी थक्क होऊन विचारमग्न होतो तर कधी त्याला सुखद धक्का बसतो. म्हणजेच अनपेक्षित शेवट हे चारुता सागरांच्या कथेचे वैशिष्ट्य आहे.

चारुता सागरांची कथा बोली भाषेत प्रकटते. व्यक्तीचे, परिसराचे, घटनेचे चित्रण ओघवत्या संवादातून जिवंतपणे उभे करणारे ओघवते संवाद हे चारुता सागरांच्या कथेचे वैशिष्ट्य आहे.

चारुता सागरांच्या कथेत कोठेही पाल्हाळ नाही. सुरूवात-मध्य-शेवट असा बांधेसुदपणाही त्यांच्या कथेत दिसून येतो. या रचना प्रकारात देखील विविधता दिसून येते परंतु ही विविधता मांडताना कथा पसरट झालेली जाणवत नाही. म्हणजेच आटोपशीर यथार्थ वर्णन हे चारुता सागरांच्या कथेचे वैशिष्ट्य आहे.

चारुता सागरांनी कथा रचनेतही विविधता आणलेली दिसते. सुरुवात-मध्य-शेवट हा सरळ मार्ग तर स्वीकारलाच पण काही कथा पूर्वलक्षी पद्धतीचा वापर करून लिहलेल्या दिसतात. त्यामुळे त्या उठावदार बनल्या आहेत म्हणजेच कथा रचनेसाठी कलात्मकता हे तंत्र वापरलेले दिसते.

चारुता सागर ज्या भूभागाचे, जमातीचे, समाजाचे वर्णन करतात त्या भागातील लोकांच्या भाषेचे प्रतिबिंब त्या कथातून जाणवते म्हणजेच त्या त्या प्रदेशातील बोलीने जिवंत झालेली शैलीदार पण अकृत्रीम अशी निवेदन आणि संवादासाठी स्वतंत्र भाषाशैलीचा वापर केल्याचे दिसून येते. अशा विविध वैशिष्ट्यांनी चारुता सागरांची कथा प्रकटते ते पहिल्या प्रकरणात पाहिले.

दुसऱ्या प्रकरणात चारुता सागरांच्या कथामधील स्त्रीजीवन कशा प्रकारचे आहे याचा विचार केला आहे. जीवनातील हरतऱ्हेचे अनुभव घेणे हाच चारुता सागरांचा स्वभाव. त्यांचा विविध व्यवसायाशी संबंध आला. यावेळी अनेक स्त्रिया भेटल्या. या स्त्रियांचे जीवनावर आणि जगण्यावर असणारे प्रेम त्यांनी जवळून पाहिले. दु:खातदेखील चिंतनशील मनाने आणि विचाराने जगणाऱ्या स्त्रियांचे दर्शन त्यांच्या कथांमधून घडते.

सासुरवास हा स्त्रीजन्माला लागलेला कलंक. स्त्रीच स्त्रीजीवनाची कशी वैरी बनते याचे दर्शन चारुता सागरांच्या कथेतून घडते. सासूचा जाच, नवऱ्याचा व्यसनीपणा, सासऱ्याचा अतिरेक, तिचे आजारपण यातून अनेक स्त्रियांना जीवन संपवावे लागते. तर काही स्त्रिया या ही परिस्थितीत तग धरतात. दाल्ला आहे म्हणून मारतोय ; पण ज्यांना नाहीच त्यांचं काय ? जातिवंत पोरी आईबापाच्या नावासाठी जगताना दिसतात.

ग्रामीण भागात शेतीच्या मशागतीसाठी बैलं व दुधासाठी म्हशी पाळल्या जातात. त्यांच्यावर स्त्रिया जीवापाड प्रेम करतात ; परंतु एखादे नैसर्गिक संकट आलेच तर गळ्यातील सौभाग्यलंकार विकूनही त्या प्राण्याचा जीव जगवण्याचा प्रयत्न करताना दिसतात. यातूनही जनावरांचा मृत्यू झाला तर ते आपल्या शेताच्या बांधावरच घालण्याचा हट्ट धरताना दिसतात. म्हणजेच चारुता सागरांच्या कथेतील स्त्रियांच्याजवळ कृतज्ञता दिसून येते.

चारुता सागरांच्या कथेमधील स्त्रिया मातृह्रदयी आहेत. आपल्या मुलांना चांगले वळण लागण्यासाठी त्या प्रयत्न करताना दिसतात. त्याचप्रमाणे त्यांची भूक भागविण्यासाठी अनेक संकटांना सामोऱ्या जाताना दिसतात. आपत्य प्राप्तीसाठी तडफडणाऱ्या स्त्रियांचे चित्रण चारुता सागरांनी केलेले आहे. त्या बरोबर मुलगी झाली तर मुलगाच हवा म्हणून मुलीचा गळा दाबणाऱ्या कठोर ह्रदयी स्त्रियांचे जीवन चित्रण केले आहे.

बऱ्याच कारणांनी पती-पत्नीला एकमेकांपासून दूर राहवे लागते; परंतु यावेळी मनातील अतृप्त कामवासना शांत राहत नाहीत. तेव्हा अनेक चंचल मनोवृत्तीच्या स्त्रिया परपुरूषाच्या प्रेमात पडताना दिसतात. तर काही स्त्रियांना पती पसंत नसल्याने परपुरूषाची शय्यासोबत करताना दिसतात. तर काही स्त्रियांना जीवनात परिस्थितीने पोटासाठी निर्वाह म्हणून देखील देहविक्रय करावा लागतो. याचे वास्तव चित्रण चारुता सागरांनी प्रकटतेने मांडले आहे.

प्रस्थापित समाजातील स्त्रियांपेक्षा भटक्या समाजातील स्त्रियांचे जीवन अंत्यत बंदिस्त असते. त्यांना जातपंचायतीच्या जाचक नियमातून जीवन कंठावे लागते. यातून एखाद्या स्त्रीने चूक केलीच तर तिला जातपंचायत कठोर शासन करते हे चारुता सागरांच्या कथेत दिसून येते.

अशा प्रकारे विविध स्वभावाच्या, वेगवेगळ्या समाजातील समस्यांनी युक्त स्त्रियांच्या जीवनाचे चित्रण चारुता सागरांनी वास्तवतेने घडविले आहे हे या प्रकरणात पाहिले.

तिसऱ्या प्रकरणात चारुता सागर यांची नायिकाप्रधान कथा कशी आहे याचा विचार केला आहे. नायिकांची जगण्याची पद्धती तिला करावा लागणारा संघर्ष इ. गोष्टींचा शोध घेताना ती धाडसी असल्याचे जाणवते. दारिद्र्यावरही ती विजय मिळवते व ध्येयवादी, त्यागमय जीवन जगताना दिसते. परिवर्तन हा तिच्या जीवनाचा आधार आहे. यासाठी ती संघर्ष करते. नवरा पसंत नाही म्हणून परपुरूषाच्या प्रेमात पडते. परंतु निसर्गदत्त जगणं ती विसरत नाही.

चारुता सागरांच्या कथेमधील नायिका परिवर्तनशील आहेत. समाजाने आपल्या सुखासाठी, शारीरिक भूक भागविण्यासाठी रीतसर करून ठेवलेली सोय म्हणजे देवदासी प्रथा. या देवदासीचे जीवन जगणारी नायिका आयुष्याच्या उत्तरार्धात आपण जगलेल्या जीवनाचा विचार करते. आपले आयुष्य वाया गेल्याचे तिला जाणवते यातूनच ही वाईट प्रथा संपवते व स्त्री दास्याला मोकळी करते. अशी परिवर्तनशील नायिका चारुता सागरांनी साकारलेली जाणवते.

सासुरवास हा तर स्त्री जीवनातील अविभाज्य भाग. कमी अधिक प्रमाणात तो प्रत्येक स्त्रीला सहन करावा लागतो. सासूसुनांच्या या भांडणात चारुता सागरांच्या कथेतील नायिका आपल्या पोटी आलेल्या मुलीसह या जाचाला कंटाळून विहिरीत पडते व पोटी आलेल्या स्त्री जातीच दु:खचं संपवून टाकते अशी वेगळ्या विचारांची परिवर्तनवादी नायिका चारुता सागरांनी चित्रित केली आहे.

लग्नासाठी हुंडा देणे हा शिष्टाचार झाला आहे; परंतु सर्वच मुलींना हुंडा देऊन लग्न करणे आईवडिलांना शक्य नसते. या हुंड्यासाठी चारुता सागरांच्या कथेतील नायिका प्राणत्याग करताना दिसतात तर काही नायिका हुंड्यासाठी न नांदवणाऱ्या सासरचा त्याग करून बापाच्या घरी स्वाभिमानी जीवन जगताना दिसतात.

स्त्रीजीवनाकडे उपभोग्य वस्तू म्हणूनच सतत पाहिले जाते. सौंदर्यवती स्त्री असेल तर ती पुरूषाची शिकार बनते. तिच्यावर अत्याचार केला जातो अशा अत्याचाराला बळी पडलेल्या नायिका चारुता सागरांनी चित्रित केल्या आहेत. या स्त्रियांना समाजाने हाकलून दिले तरी त्या जीवनाचा अंत न करता जगतात. त्यांचे जीवनावर आणि जगण्यावर अतिशय प्रेम दिसून येते. तर काही नायिका तोंड लपविण्यासाठी आईबापाचे घर जवळ करतात यातून चारुता सागरांनी स्त्रियांच्यावर होणाऱ्या अत्याचाराचा सामाजिक प्रश्नच मांडलेला आहे.

चारुता सागरांनी ध्येयवादी, त्यागी नायिकादेखील साकारल्या आहेत. प्रेमापोटी प्रसंगी अपंग जोडीदाराची निवड करून सुखाचा संसार करताना दिसतात. यातून चारुता सागरांनी साकारलेल्या नायिकेची स्वयंपूर्णता शिगोशिग भरलेली जाणवते.

चारुता सागरांनी भटक्या समाजातील स्त्रियांनासुद्धा आपल्या कथेच्या नायिका केल्याचे जाणवते. भटकंतीतून त्याच्या वाट्याला आलेले दु:ख, संघर्षमय जीवन व यातूनही त्यांची नात्यामध्ये असणारी ओढ, जोडीदाराबद्दल नायिकेचे असणारे प्रेम प्रकटतेने जाणवते.

पुरूषी अहंकार, हेकखोरपणा, धाडसी वृत्ती यामुळे नायिकेच्या जीवनाचा अंत होतो याचे चित्रण चारुता सागरांनी केले आहे.

चारुता सागरांनी साकारलेली नायिका धाडसी असल्याचे जाण्वते. तिच्यावर येणारी संकटे ती बेडरवृत्तीने परतावताना दिसते. प्रसंगी जीवावर उदार होऊन ती आपल्या चारित्र्याचे रक्षण करताना दिसते.

मनासारखा जोडीदार न मिळाल्याने परपुरूषाच्या प्रेमात पडणाऱ्या नायिका देखील चारुता सागरांनी साकारलेल्या दिसतात. प्रसंगी समाजाच्या विरोधामुळे प्राणत्यागही करतात. तर काही नायिका धाडसी मनाने परपुरुषाबरोबर संसार सोडून पळून जातात. अशा सर्वसामान्य स्त्रियांपेक्षा मुलखावेगळ्या जीवन जगणाऱ्या प्रसंगी प्राणार्पण करणाऱ्या सोशीक तसेच बंडखोर नायिकांच्या अंर्तमनात प्रवेश करून त्यांचे अंतरंग चारुता सागरांनी खुले केल्याचे जाणवते.

चौथ्या प्रकरणात चारुता सागर चित्रित स्त्री समस्या आणि उपाय यांचा विचार केला आहे. स्त्रीला अबला म्हणून समाजाने हीन दर्जाची वागणूक दिली आहे. तिचा हवा तसा वापर करून तिच्या पदरी अनेक समस्या बांधल्या आहेत. स्त्रीचे अधिकाधिक शोषण कसे होईल हाच विचार पुरुषी मनात रूजल्याने स्त्री जीवनात समस्याची मालिकाच तयार झाली आहे.

अन्न, वस्त्र, निवारा यातील अन्न ही प्रमुख गरजच स्त्री आपल्या मुलाची भागवू शकत नाही. यासाठी तिला पुरूषावरच अवलंबून राहावे लागते. जातीमधील तेढ, दुष्काळ, अवर्षण इ. कारणाने भुकेची समस्या निर्माण होताना दिसते. तेव्हा उपाय म्हणून ती आपल्या पतीलाचा मदतीची याचना करताना दिसते.

स्त्रियांना पसंत असलेल्या पुरूषाबरोबरच लग्न करता येईल असे नाही. जातीयता, समाजाचे नियम तिला पाळावे लागतात यावर उपाय म्हणून जातीचे नियम धुडकावून ती पळून जाऊन लग्न करताना दिसते.

स्त्रीला मातृत्व लाभणं ही अत्यंत आनंदाची व भाग्याची गोष्ट. परंतु तिच्या पोटी गर्भ अंकुरलाच नाही तर समाज तिची हेटाळणी करतो. नावे ठेवतो आणि मूल झालेच तर मुलगाच हवा. मुलगी नको. इत्यादी कारणांनी स्त्री जीवनात समस्या निर्माण होतात. यावर उपाय म्हणून काही स्त्रिया दुसऱ्या मुलांना जवळ करताना दिसतात तर काही स्त्रिय पोटी आलेल्या मुलीचा गळा दाबून मारून टाकताना दिसतात.

स्त्रियांच्या जीवनात दागिने, पैसा, सौदर्य यामुळेही समस्या निर्माण होतात. दागिन्यांमुळे स्त्रीचे नांदणे तुटते. तिला लुटली जाते. सौदर्यांच्या हव्यासातून तिचे शील भ्रष्ट केले जाते तर काही स्त्रिया सौदर्यवान नसल्याने लग्नचं होत नाही यावर उपाय म्हणून दागिन्यांसाठी नांदणे तुटलेल्या स्त्रिया बापाच्या घरी स्वाभिमानाने जगताना दिसतात. तर काही स्त्रिया पुरूषी अत्याचारापासून धाडसाने सुटका करून घेताना दिसतात ; पण सौदर्य आणि हुंड्यासाठी पैसे नसणाऱ्या मुली विहीर जवळ करतात.

स्त्रीजीवनाला सासुरवास हा एक कलंक आहे. सुनेचा छळ करण्यासाठी सासूला क्षुल्लक कारणही पुरेसे आहे. अगदी सून आजारी असेल, बाळंत झाली असेल तरीही तिने सासूचा मान राखून तिची कामे केलीच पाहिजेत. या समस्येवर उपाय म्हणून काही स्त्रिया विहीर जवळ करतात तर काही स्त्रिया खंबीर मनाने आपल्या वाट्याला आलेले जीवन जगताना दिसतात हा उपाय चारुता सागरांनी सांगितलेला दिसून येतो.

समाजाने स्त्रीला अबला बनवून दासी केले. तिचा शारीरिक उपभोग ही तर पुरूषांची मक्तेदारीच. अनैतिक संबंधातून पोटी अंकुरलेला गर्भ कुणाचा ? त्याला मालक कोण ? शेवटी तिला समाजाला तोंड दाखविणे कठीण बनते ही तिची समस्या. या समस्येवर उपाय म्हणून काही स्त्रिया विहीर जवळ करतात तर काही स्त्रियांना समाज बहिष्कृत करतो. तिच्या वाट्याला दिशाहीन जीवन येते तर काही स्त्रिया आईबापाचे घर जवळ करताना दिसतात हा उपाय चारुता सागरांनी सुचविला आहे.

प्रत्येक स्त्रीला आपला पती कर्तृत्ववान हवा असतो. जर तिची इच्छा पतीकडून पूर्ण झालीच नाही तर या संसारात अर्थ उरत नाही. यातूनच तिचे पतीवरील प्रेम कमी होता जाते.

यातून संघर्ष निर्माण होतो यावर उपाय म्हणून ती विहीर जवळ करताना दिसते. काही स्त्रिया मात्र परपुरूषाला जवळ करून आपणाला हवे ते सुख उपभोगताना दिसून येतात.

स्त्रीचा आधार पुरूष; पण तोच अर्ध्या वाटेत सोडून गेला तर तिच्या वाट्याला वैधव्य येते. तिला विधवा, काळ्या तोंडाची म्हणून समाज हेटाळणी करतो. या समस्येवर उपाय म्हणून काही स्त्रिया धीराने परिस्थितीवर मात करतात. खंबीर मनाने जगताना दिसतात. तर काही स्त्रिया दुसऱ्या पुरूषाशी संबंध जोडतात. परंतु काही स्त्रिया वैधव्यातही पतीनिष्ठा जपताना दिसतात.

चारुता सागरांच्या कथेमधील स्त्रियांना सामाजिक, नैसर्गिक, आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. या समस्यावर उपाय म्हणून त्या बंड करताना दिसतात. परिस्थितीने वाट्याला दिलेले दु:ख झेलत जीवनाला सामोऱ्या जातात. त्यांचे जीवनावर आणि जगण्यावर निरतीश प्रेम दिसून येते.

चारुता सागरांच्या कथासंग्रहामध्ये चिरेबंदी वाड्यात राहणाऱ्या स्त्रियांपासून ते भटकंती करणाऱ्या, पालात राहणाऱ्या स्त्रियांचे जीवन चित्रित झालेले आहे. या स्त्रियांच्या वाट्याला येणारे जीवन हे अतिशय खडतर, दु:खमय, संघर्षमय असल्याचे जाणवते. हे दु:ख काही स्त्रिया निमूटपणे सहन करतात. तर काही स्त्रिया याविरूद्ध बंड पुकारतात, तर काही स्त्रिया या दु:खाला कंटाळून आत्महत्या करताना दिसतात. याचा अर्थ त्या कमकुवत मनाच्या आहेत असा नाही तर आईबापाचे नाव खराब होण्यापेक्षा आपणच संपवून घेतलेले काय वाईट ? असे वाटणे साहजिकच आहे.

चारुता सागर हे स्वातंत्र्योत्तर काळातील महत्त्वाचे लेखक आहेत. त्याच्या अफाट आणि अमर्याद फिरण्यातून त्यांनी स्त्रीजीवनाचे अत्यंत सूक्ष्म व वास्तव चित्र पाहिले आहे यामुळे त्यांनी चित्रित केलेल्या स्त्रियांच्या समस्या या प्रातिनिधीक असल्या तरी त्या विविध सामाजिक प्रश्नच मांडताना दिसतात. पुरूष संस्कृतीने स्त्रीजीवनावर केलेल्या अन्यायाला वाट मोकळी करून देण्याचे कामच चारुता सागरांनी केले आहे.